शोधप्रबंधाचा आराखडा

“अहिल्याबाई होळकरांचे लोककल्याणकारी कार्ये–एक राजकीय अभ्यास“

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत **राज्यशास्त्र** विषयात

पीएच.डी. (ph.D.) पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. या विद्यापीठास

सादर करावयाचा **शोधप्रबंधाचा आराखडा**

: संशोधक :

प्रा.बनगर दत्ता दशरथ

एम.ए. बी.एड. सेट

श्री छत्रपती शिवाजी ज्युजिअर कॉलेज,

सगरोळी.

मार्गदर्शक :

प्रा. डॉ. एस.बी. फड

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय

नांदेड.

जून–2015

“अहिल्याबाई होळकरांचे लोककल्याणकारी कार्ये— एक राजकीय अभ्यास””

प्रस्तावना

भारताच्या इतिहासात वळुन पाहिले असता असे दिसते की, या देशात अनेक राजे, संस्थानिक, सरदार होऊन गेले की, त्यांनी आपल्या कार्य व कर्तृत्वाच्या बळावर आपली राज्यव्यवस्था आदर्श बनवली. व नावारूपाला आणली.त्यांनी केलेल्या आदर्श राज्यकारभाराची आधुनिक राजकीय व्यवस्थेतील नेते व सामान्य जनता यांना सातत्याने आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केवळ पुरूष राज्यकर्तेच होते. असे नाही. तर काही महिला राज्यकर्त्या देखिल होत्या. की, ज्यांनी आपल्या राज्याचा किंवा संस्थानाचा राज्यकारभार करीत असतांना खुप मोठे कर्तव्य बजाउन जनतेप्रती उत्तरदायीत्वाची भावना बाळगून सातत्याने लोककल्याणकारी कार्य केली आहेत. अशा भारताच्या राजकीय पटलावर काही महिला राज्यकर्त्या होउन गेल्या आहेत. झाशीची राणी लक्ष्मीबाई, जीजाबाई व लोकमाता अहिल्याबाई होळकर इत्यादी.

इंदोरच्या होळकरांचे राज्य म्हणजे मराठी राज्यसत्तेमधील एक महत्वाचे संस्थान होते. इंदोर राज्याच्या होळकरशाहीमध्ये अनेक राजे होउन गेले. त्यामध्ये आदर्श महिला राज्यकर्त्या म्हणून अहिल्याबाई होळकरांचा सिंहाचा वाटा होता. इंदोर राज्याची जवळ जवळ 29 वर्षे सत्ता ही अहिल्याबाईंच्या हाती होती.त्यांनी अत्यंत पारदर्शकपणे राज्यकारभार केला. जनतेप्रती फार मोठी उत्तरदायित्वाची भुमिका त्यांनी पार पाडली. त्यांनी अनेक प्रकारे लोककल्याणाची कामे केलेली आहेत.आज आपण लोकशाहीमध्ये कल्याणकारी राज्याची संकल्पना अभ्यासतो. पण स्वातंन्त्र्याच्या अगोदर राजेशाहीच्या काळात देखिल या महिला राज्यकर्तीने कशा प्रकारे लोककल्याणाची कामे करून आपले राज्य कल्याणकारी राज्य बनवले. हे त्यांच्या अनेक कार्यावरून समजून येते.

आज समाजामध्ये अहिल्याबाई होळकरांच्या कार्याबद्दल जी माहिती समोर आली व त्यावरून त्यांच्याबद्दल जी लोकांची मने तयार झाली. ती गोष्ट एकांगी स्वरूपाची वाटते.यामध्ये अहिल्याबाईंच्या धार्मिक कार्याचीच माहिती पुढे आली आहे. त्यांनी धार्मिक व सांस्कृतिक स्वरूपाची अनेक कार्ये केली आहेत. ही गोष्ट तर नाकारता येणार नाहीच.अगदी मोठमोठी मंदिरे, त्यांचा जिर्णोध्दार, धर्मशाळांचे बांधकाम यावरून हे सिध्द होते. पण अहिल्याबाईंनी राजपदावरून राज्यकारभार करत असतांना इतरही लोककल्याणकारी कार्ये केली आहेत. त्याच्या धार्मिक कार्यापेक्षाही इतर

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक,आर्थिक कार्यदेखील फार महत्वाचे होते . अहिल्याबाईंच्या कार्याबद्दल असा एकांगीपणा समोर आला व त्यांच्या इतर बाबीवर प्रकाश टाकलेला नाही. म्हणून इतर बाबीवर प्रकाश टाकण्याची गरज वाटते.

विशेषतः अहिल्याबाईंनी एका राज्याच्या प्रमुख राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली. ती आजच्या लोकशाहीतील शासनासाठीही मार्गदर्शक ठरतील. राज्यकारभार, करत असतांना जनतेप्रती उत्तरदायित्व, आत्मीयतेची भावना, जबाबदार राज्यकारभार कायदयाचे राज्य, निःपक्ष न्यायव्यवस्था,उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था,धाडसी निर्णयक्षमता ,सामान्य व दुर्बलांना न्याय अशा स्वरूपाची कल्याणकारी कार्ये केली आहेत. यातुन राजकारणामागे त्यांचा दृष्टीकोण कसा होता हे लक्षात येते म्हणून प्रस्तुत संशोधनात एका राज्याच्या प्रमुख म्हणुन त्यांनी वेगवेगळी लाककल्याणकारी कार्ये कशा प्रकारे केली व त्यांच्या जिवनाच्या केवळ एका अंगाचा अभ्यास न करता त्या प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने व त्यांनी केलेल्या कार्याचा राजकीय दृष्टीने अभ्यास करण्यासाठी व समाजासमोर इतरही विविध स्वरूपाच्या कार्याची माहिती आणण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची, महत्वाची व उत्कृष्ठ राज्यकर्तीची भुमिका समाजासमोर येईल. राजकीय अभ्यासाच्या दृष्टीने त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

अभ्यासाची उद्दिष्टये

1 अहिल्याबाई होळकर यांच्या समकालीन परिस्थीतीचा अभ्यास करणे.

2 एक आदर्श राज्यकर्ती म्हणून त्यांच्या लोककल्याणकारी कार्याचा अभ्यास करणे.

3वर्तमान काळातील शासनाच्या धोरणाशी सांगड घालून अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय व्यवस्थेमध्ये असणाऱ्या बाबींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

4 अहिल्याबाईंच्याआदर्श राज्यकारभाराचे अध्ययन करणे.

5 अहिल्याबाई होळकरांच्या लोककल्याणकारी कार्यामुळे समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

अभ्यासाची गृहितके

1 अहिल्याबाई होळकरांनी तत्कालीन परिस्थितीत सामाजिक व राजकीय दृष्टिकोण बाळगुन कार्याला सरूवात केली.

2 अहिल्याबाई होळकरांचे कार्य सर्वव्यापक व लोककल्याणकारी असे होते.

3 हिल्याबाई होळकरांच्या कार्याचा मध्यबिंदू हा सामान्यजन होता.

4हिल्याबाई होळकर यांच्या राजकीय व्यवस्थेमुळे तत्कालीन सामाजिक, राजकीय हेतुंची पुर्तता झाली.

5हिल्याबाई होळकरांच्या कार्यामुळे समाजावर सकारात्मक परिणाम झाले.

अभ्यास वि"kयाचे महत्व

कालमान व परिस्थितीनरूप महान वकर्तबगार व्यक्तींचे विचार, कार्य व चरित्र समाजाला मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात. त्यांचा आदर्श घेउन समाज वाटचाल करत असतो.त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यानंतर तत्कालीन परिस्थितीत त्यांनी घालुन दिलेला आदर्श आजच्या काळातही उपयुक्त ठरतो.

भारताच्या इतिहासात 1766 ते 1795 या 29 वर्षाच्या काळात लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वाखाली एक समृध्द, गौरवशाली, कल्याणकारी ज्याला शिवरायानंतरचा सुवर्णकाळ म्हणता येईल. असे एक लोकराज्य होते. होळकरांचे इंदोर स्टेट. लोकमाता अहिल्याबाई होळकर या मराठा इतिहासातील कर्तृत्ववान राज्यकर्त्या होत्या.संकटाच्या परिस्थितीत आलेली राजकीय जबाबदारी, शत्रुंची चाल अशा परिस्थितीत न डगमगता पारदर्शक राज्यकारभार सांभाळुन प्रजेचे हित,वैराग्य भावना,अनेक कल्याणकारी कार्ये,राजकीय, सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक कार्ये यांची ओळख होणे गरजेचे आहे. एक राज्यकर्ता कसा असावा. व कल्याणकारी राज्य कशा प्रकारे असावे. यासाठी समाजाला त्यांचे विचार व कार्येमार्गदर्शक ठरू शकतील. म्हणून

त्यांच्या विचार व कार्याची समाजाला व देशाला गरज आहे.त्यामुळे या संशोधनास महत्व आहे.

अहिल्याबाईंच्या उपरोक्त कार्याकडे आजपर्यंत फारसे लक्ष दिलेले नाही.फक्त अहिल्याबाई होळकरांचे धार्मिक कार्ये, मंदिरांचा जिर्णोध्दार,मंदिरास नियमित मदत आदिंचाच अभ्यास झाला. म्हणून त्यांचा राज्यकारभार ,प्रजाहितदक्षता पुढे यावी.या दृष्टीने प्रस्तुत संशोधन अधिक महत्वाचे ठरणार आहे.

.अध्ययन पध्दती

प्रस्तुत संशोधन कार्ये शास्त्रीय पध्दतीने केले जाणार आहे. संशोधनातील निष्कर्ष हे शास्त्रीय असतील. अभ्यास विषयाचे निश्चीत उदिष्टे साध्य करण्यासाठी नियोजनबध्द रितीने संशोधन केले जाईल. सदरील विषयाचे संशोधन करीत असतांना विश्लेषानात्मक, वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन

प्रत्येक संशोधनासाठी तथ्य संकलनाची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात येईल.

1 संशोधनाच्या प्राथमिक स्त्रोतांमध्ये अहिल्याबाई होळकर यांच्या जिवन चरित्र व कार्याचा अभ्यास करणारे अभ्यासक आणि तत्वज्ञ यांच्याशी भेटी,चर्चा, मुलाखत घेउन व अहिल्याबाईंनी लोककल्याणासाठी बांधलेल्या वास्तुंचे निरीक्षण करून तथ्य संकलित करण्यात येतील.

2 व्दितीय स्त्रोता अंतर्गत संशोधन विषयासंबधीचे साहित्य, चरित्रे, संदर्भग्रंथ,वर्तमानपत्रातील लेख,अग्रलेख ,मासिके, अधिकृत प्रकाशने, शासकीय दस्तऐवज,पुस्तके,इंटरनेट इत्यादी.स्वरूपाच्या स्त्रोतांव्दारे प्राप्त होणाऱ्या माहितीवर भर देउन तथ्य संकलित करण्यात येतील.

संषोधन आराखडा

प्रस्तुत अभ्यास विषय हा “अहिल्याबाई होळकरांचे लोककल्याणकारी कार्ये–एक राजकीय अथ्यास” असा आहे. यातील प्रमुख पैलू लक्षात घेउन या अभ्यासाची विभागणी पुढील प्रकरणात केली आहे.

1 प्रकरण पहिले–प्रस्तावना

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना,अभ्यासविषयाचे महत्व, अभ्यासाची उद्दिष्टे,अभ्यासाची गृहितके,अध्ययन पध्दती,तथ्य संकलन पध्दती,अभ्यासाच्या मर्यादा,प्रबंधाच्या प्रकरणाची रचना इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येणार आहे.

2 संषोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाशी संबधीत उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा अभ्यास करण्यात येईल.

3तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती आणि अहिल्याबाईंचे नेतृत्व

प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करण्यात येईल. एक शूर मराठा सरदार,होळकर राजघराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर केलेली इंदोर संस्थानाची स्थापना,त्याच काळात खंडेराव होळकरांचे झालेले निधन व त्यानंतर अहिल्याबाईंवर येउन पडलेली राज्यकारभाराची जबाबदारी यांचा आढावा घेण्यात येईल.

4 अहिल्याबाई होळकर आणि लोककल्याणकारी कार्ये

अ सामाजिक कार्ये–

प्रस्तुत भागात एक राज्यप्रमुख म्हणून त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा,समाज कल्याणाच्या योजना यांचा आढावा घेण्यात येईल.
अनाथाश्रम,बालकाश्रम,महिलाश्रम,वाटसरूंना धर्मशाळा ,विधवा निपुत्रिकांना दत्तक

अधिकार ,मोफत अन्नछत्र,भटक्या आदिवासीसाठी सवलती,हुंडाबंदी,सतीप्रथाबंदी,अश्पृश्यता निवारण अशा कार्याचा आढावा घेण्यात येईल.

ब राजकीय कार्ये–

या भागात राज्यकारभार,राजकीय सुधारणा,इतर राज्यांशी संबंध,निधर्मी राज्यव्यवस्था,सुरक्षा व्यवस्था,न्यायदान व प्रशासन व्यवस्था अशा बाबींचा अभ्यास करून विश्लेषण केले जाईल.

क आर्थिक कार्ये–

सदरील भागात राज्याच्या आर्थिक सुधारणांच्या पैलूवर प्रकाश टाकला जाईल वंचितांना अर्थसहाय्य,शेतीसाठी पाणी,बेरोजगारांसाठी विशेष प्रकल्प,

हस्तव्यवसायांना प्रोत्साहन,गृहउदयोग व बाजारपेठेस चालना,शेती उत्पादन वाढीस प्रोत्साहन अशा कार्यांचा आढावा घेतला जाईल.

ड सांस्कृतिक कार्ये–

या भागात सांस्कृतिक कार्याचा आढावा घेतला जाईल.लोककला व कलाकारांना प्रोत्साहन,धर्मशाळा, मंदीरे यांचा जिर्णोध्दार , अनेक भाषेत ग्रंथाच्या लेखणास प्रोत्साहन,कवी,विचारवंत,साहित्यीकांशी चर्चा अशा बाबींचा आढावा घेतला जाईल.

5 अहिल्याबाई होळकरांचे विचार व कार्य आणि सामाजिक परिवर्तन

प्रस्तुत प्रकरणात राज्यप्रमुख म्हणून केलेल्या लोककल्याणकारी कार्याचा समाजावर झालेल्या परिणामांचा अभ्यास केला जाईल.

6सारांश,fu"d"k o f'kQkj'k

प्रस्तुत प्रकरण हे केलेल्या अभ्यासाच्या सारांशाच्या व त्यातून प्राप्त झालेल्या निष्कर्षा संबधीचे राहिल.एकुणच या अभ्यासात अहिल्याबाई होळकरांच्या कार्याचा सांगोपांग अभ्यास केला जाईल आणि त्यांचे कार्ये समाजासाठी किती महत्वाचे व आदर्श आहे. हे राजकीय दृष्टिकोणातून तपासले जाईल.

संदर्भग्रंथ

1 गोखले वा.दा.,प्रकाश जी. एल. अहिल्याबाई होळकर, ठोकळ प्रकाशन,पुणे 1949.

2मुक्ताबाई लेले, देवी अहिल्याबाई, दामोदर सावळाराम प्रकाशन,1939.

3 धर्मभास्कर (अहिल्याबाई होळकर विशेषांक), संपादक–अवधुत शास्त्री, 1975.

4 हिरालाल शर्मा, अहिल्याबाई नॅशनल बुक टस्ट, दिल्ली.

5 देविदास पोटे, अ अहिल्याबाईचा,अहिल्याबाई होळकर स्मारक समिती.

6 होळकर मधुसुदन,होळकरांचा इतिहास,दिल्ली होळकर संघ,1992.

7 माल्कम सर जॉन, द मेमोरियर ऑफ सेंटल इंडिया.

8 शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक अहिल्या स्मरणिका,अहिल्या स्मारक समिती, 1974.

9 गुजर यादव, मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ,प्रकाशक वसंत बुरडे,1991.

10 गर्ग सुधाकर गणेश,अहिल्या स्मृती,सार्वजनिक अहिल्याबाई जन्मोत्सव समिती इंदोर.

11 हाडपे म. शि., पुण्यश्लोक अहिल्यादेवी,ललीत प्रकाशन जळगाव,1995.

12 विनया खडपेकर, ज्ञात–अज्ञात अहिल्याबाई, राजहंस पंकाशन,पुणे2007.

13 शर्मा उदयभानू,लाकमाता अहिल्या,अहिल्यात्सोव समिती इंदोर,1932.

14 भागवत अ.ना.,होळकरांची कैफीयत,केळकर प्रकाशन,1820.

15 भागवत अ. ना.,होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, 1924.

16 असनादकर कृष्णराव,देवी अहिल्याबाई इ.पी.शेट्टे प्रकाशन,मुंबई,1934.

17 भट विठ्ठलराव,राजयोगिणी अहिल्याबाई,मनोविकास प्रकाशन,2013.

18 डॉ. सगर शिवाजी, थोर क्रांतीकारक महिला,अरूणा प्रकाशन, लातूर,2013.

19 महाराष्ट शासन विशेषांक,लोकराज्य अहिल्याबाई होळकर ऑक्टो–1995.

: संशोधक :

प्रा.बनगर दत्ता दशरथ

एम.ए. बी.एड. सेट

श्री छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज,

सगरोळी.

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ. एस. बी. फड

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय

नांदेड.